सातारा जिल्हा परिषद, ग्रामपंचायत विभाग
दूरवनी क्रमांक ०२१६२/२३३८४३ ईमेल vptzpsatara२@yahoo.in

---

जा. क्र.ग्रापं/५/कावि/ग्राउभाउ/२०१६, दि. ५/४/२०१६

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती .... (सर्व)
जिल्हा सातारा

विषय :-**ग्राम उदय से भारत उदय अभियान (दि.१४ एप्रिल,२०१६ ते दि.२४ एप्रिल, २०१६)**
**अंतर्गत विविध उपक्रम हाती घेणेबाबत...**

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक ४/४/२०१६.

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार, दिनांक १४ एप्रिल, २०१६ (डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती) ते दिनांक २४ एप्रिल,२०१६ (राष्ट्रीय पंचायत राज दिवस) या कालावधीत **"ग्राम उदय से भारत उदय अभियान"** प्रभावीपणे राबविण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर पत्रात नमुद केलेनुसार सातारा जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी ग्राम उदय से भारत उदय अभियान तीन टप्प्यात राबविण्याचे आहे.

१) सामाजिक एकताः दिनांक १४ ते १६ एप्रिल, २०१६.
२) ग्राम किसान सभा : दिनांक १७ त २० एप्रिल, २०१६.
३) राष्ट्रीय पंचायत राज दिवस ग्रामसभाः दिनांक २१ ते २४ एप्रिल, २०१६.

उपरोक्त नमुद प्रत्येक टप्प्यामध्ये विविध उपक्रम हाती घ्यावयाचे असून, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमुद केलेले प्रभात फेरी,सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा, ज्येष्ठ नागरीकांचा सन्मान **इ.उपक्रम सर्व ग्रामपंचायतींनी हाती घ्यावयाचे आहेत**. या उपक्रमाबरोबरच सातारा जिल्हा परिषदेचे काही महत्वाचे उपक्रमदेखील हाती घ्यावयाचे आहेत. परंतु, साधन व्यक्ती (Resource Persons) ची उपलब्धता विचारात घेऊन जिल्हा परिषदेचे उपक्रम खालील निवडक गावांमध्ये राबवावयाचे आहेत.

| **अ.क्र.** | **तालुका** | **ग्रामपंचायतीचे नाव** |
|---|---|---|
| १ | सातारा | १) सोनगाव, २) कोंडवे, ३) नागठाणे ४) नांदगाव |
| २ | कराड | १) पाल, २) उंब्रज, ३) इंदोली |
| ३ | पाटण | १) तारळे, २) वेखंडवाडी, ३) सोनवडे |
| ४ | फलटण | १) दुधेबावी, २)फडतरवाडी, ३) कापशी, ४) तरडगाव |
| ५ | माण | १) गोंदवले खुर्द, २) पांढरवाडी, ३) लोधवडे. |

- **उपक्रमाचे नियोजन खालीलप्रमाणे करावयाचे आहे.**

| अ. क्र. | उपक्रम | माध्यम | उपस्थित ठेवावयाचे घटक |
|---|---|---|---|
| १. | सामाजिक एकोपा, व्यसनमुक्ती, गर्भसंस्कार. | साधन व्यक्ती (ब्रम्हाकुमारीज्) | **सर्व महिला** (विशेषतः गरोदरमाता, स्तनदा माता, किशोरवयीन मुली, महिला बचत गट सदस्य, महिला ग्रा.पं.सदस्य इ.) |
| २. | आपले आरोग्य आपल्या हाती | साधन व्यक्ती + C.D. (साधन व्यक्ती उपलब्ध नसल्यास सी.डी.) | **सर्व महिला** (विशेषतः गरोदरमाता, स्तनदा माता, किशोरवयीन मुली, महिला बचत गट सदस्य, महिला ग्रा.पं.सदस्य इ.) **व सर्व ग्रामस्थ**. |
| ३. | सेंद्रिय शेती (Organic Farming) | साधन व्यक्ती + C.D. (साधन व्यक्ती उपलब्ध नसल्यास सी.डी.) | **सर्व ग्रामस्थ** (विशेषतः शेतकरी व महिला) |

महत्वाच्या सूचना :-

१) उपरोक्त कार्यक्रम हाती घेण्याबाबत सर्व संबंधित ग्रामपंचायतींना सूचना द्याव्यात.

२) उपरोक्त् कार्यक्रमासाठी संबंधित घटकांची उपस्थिती असणे महत्वाचे आहे. यासाठी महिला, ग्रामस्थांना उपस्थित ठेवण्याची संयुक्त जबाबदारी ग्रामसेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, विस्तार अधिकारी (NRLM), महिला बचतगट सदस्य, विस्तार अधिकारी (आरोग्य), आरोग्य सेविका, आशा गटप्रवर्तक व आशा वर्कर्स, विस्तार अधिकारी (शिक्षण)/केंद्रप्रमुख, प्राथमिक शिक्षक यांची राहील.

३) त्यादृष्टीने गावस्तरीय कर्मचाऱ्यांना स्वतंत्र सूचना निर्गमित करणेबाबत गट शिक्षणाधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना आपलेस्तरावरुन कळविण्यात यावे.

४) उपरोक्त कार्यक्रमांना गावातील जास्तीत जास्त लोक उपस्थित राहतील यासाठी कार्यक्रमाचे वेळापत्रक निश्चित करताना गावातील लोकांच्या सोईची वेळ निश्चित करावी.

५) सदरचे कार्यक्रम ग्राम उदय से भारत उदय अभियानांतर्गत दिनांक १४ ते २४ एप्रिल, २०१६ या कालावधीत आयोजित करावयाचे आहेत. त्यानुसार साधन व्यक्ती यांचेशी चर्चा करुन दिनांक व वेळ निश्चित करावी.

६) सामाजिक एकोपा, व्यसनमुक्ती, गर्भसंस्कार य कार्यक्रमासाठी ब्रम्हाकुमारीज् चे श्री.वामनभाई, प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, कल्याणी इस्टेट, जिल्हा परिषदेसमोर, सातारा (मोबा.क्र. ९४२०४६५६७६) यांचेशी सल्लामसलत करुन तारीख व वेळ निश्चित करावी.

७) आपले आरोग्य आपल्या हाती आणि सेंदिय शेती या कार्यक्रमासाठी आवश्यक असणाऱ्या सी.डी./डी.व्ही.डी. श्री. श्रीकांत ताडे, आय.टी.कक्ष, तिसरा मजला, जिल्हा परिषद सातारा (मोबा.क्र. ९४२२४०४२६७) यांचेकडून प्राप्त करुन घेणेची जबाबदारी गट विकास अधिकारी यांची राहील.

८) कार्यक्रमाचे ठिकाणी यथोचित बैठक व्यवस्था, ग्रामस्थांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्पीकर व्यवस्था, संगणक व डी.व्ही.डी. प्रदर्शित करण्यासाठी स्क्रिन व प्रोजेक्टरची व्यवस्था करावी. ग्रामपंचायत स्तरावर प्रोजेक्टर व स्क्रीन उपलब्ध नसल्यास पंचायत समिती पातळीवरील शिक्षण विभाग किंवा आरोग्य विभागाकडील प्रोजेक्टर व स्क्रिन ग्रामपंचायतीला उपलब्ध करुन द्यावी.

९) कार्यक्रमाचे Documentation करावे. फोटोग्राप्स (सॉप्ट कॉपी) व अहवाल या कार्यालयास सादर करावेत.

१०) वरील उपक्रमांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, जि.प. व पं.स. चे सन्मा.पदाधिकारी/ सदस्य यांना सहभागी करुन घ्यावे.

उपरोक्त सूचनांनुसार निवडलेल्या गावांमध्ये कार्यवाही उपक्रम राबविण्यात यावेत. तसेच ग्राम उदय से भारत उदय अभियान अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार सर्व ग्रामपंचायतीमध्ये उपक्रम हाती घेण्यात यावेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद सातारा

प्रत :- माहितीसाठी सस्नेह अग्रेषित

१) मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा
२) मा.उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, सातारा
३) मा.सभापती, अर्थ, शिक्षण व क्रिडा समिती, जिल्हा परिषद सातारा
४) मा.सभापती, कृषि, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती, जिल्हा परिषद सातारा
५) मा.सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, सातारा
६) मा.सभापती, महिला व बाल विकास समिती, जिल्हा परिषद सातारा.
७) मा.सभापती, पंचायत समिती... (सर्व), जिल्हा सातारा

प्रत :- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी –

१) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा.
२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,सातारा.
३) महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद,सातारा.
४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सातारा.
५) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद सातारा.